# मे. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई

सीएसए ७६७/२०१७
कंपनी कायदा, २०१३ खालील केसमध्ये (१८/२०१३)
आणि
एकत्रिकरणाच्या योजनेबाबतच्या प्रकरणात
दरम्यान
**बालाजी अमाईन्स लि. (ट्रान्सफरी कंपनी)**
आणि
**भाग्यनगर केमिकल्स लिमिटेड (प्रथम ट्रान्सफरर कंपनी)**
आणि
**बालाजी ग्रीनटेक प्रॉडक्टस् लिमिटेड (द्वितीय ट्रान्सफरर कंपनी)**
आणि

त्यांचे माननीय शेअरधारक आणि धनको

बालाजी ग्रीनटेक प्रॉडक्टस् लिमिटेड, ही कंपनी कायदा, १९५६ च्या तरतुदीप्रमाणे बनविलेली कंपनी असून तिचा CIN नंबर U24230PN200PLC168220 आणि तिचे नोंदणीकृत ऑफीस बालाजी टॉवर्स, नं. ९/१अ/१, होटगी रोड, आसरा चौक, सोलापूर महाराष्ट्र-४१३२२४, भारत, तिचे प्रतिनिधीत्व पूर्णवेळ संचालक श्री. गड्डम हेमंथ रेड्डी, email : ghr@balajiamines.com, Ph. : 0217-2310824

...... अर्जदार/ट्रान्सफरर कंपनी

नोटीस आणि जाहीर नोटीस १० टक्के प्राधान्यीकृत भागधारक बालाजी ग्रीनटेक प्रॉडक्टस् लि.चे शेअरधारकांचे सभेची नोटीस/द्वितीय ट्रान्सफरर कंपनी.

आपल्याला अशी सूचना देण्यात येत आहे की, दिनांक २३ ऑगस्ट २०१७ च्या आदेशाने मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई पीठाने १० टक्के प्राधान्यीकृत भागधारक बालाजी ग्रीनटेक प्रॉडक्टस् लिमिटेडचे यांची सभा बालाजी अमाईन्स लि. (ट्रान्सफरी कंपनी) आणि भाग्यनगर केमिकल्स लि. (प्रथम ट्रान्सफरर कंपनी) आणि बालाजी ग्रीनटेक प्रॉडक्टस् लि. (द्वितीय ट्रान्सफरर कंपनी) यांचे एकत्रिकरण करण्याच्या योजनेबाबत विचार विनिमय करण्यासाठी आणि जर योग्य वाटल्यास जशीच्या तशी किंवा जरूर त्या दुरुस्त्यासह एकत्रिकरण योजना मंजूर करणेसाठी त्यांचे भागधारक व धनको यांची सभा बोलावण्याचा निर्देश दिला.

सदरचे आदेशास अनुसरून आणि त्यामध्ये आणखी दिलेल्या निर्देशानुसार याबाबत आणखी सूचना देण्यात येते की, बालाजी ग्रीनटेक प्रॉडक्टस् लिमिटेडच्या १० टक्के प्राधान्यीकृत भागधारकांची सभा ही दिनांक २५ ऑक्टोबर २०१७ रोजी दुपारी १.०० वाजता कंपनीचे नोंदणीकृत ऑफीसमध्ये म्हणजे बालाजी टॉवर्स, नं. ९/१अ/१, होटगी रोड, आसरा चौक, सोलापूर महाराष्ट्र-४१३२२४, भारत येथे होईल. त्यामुळे कंपनीचे १० टक्के प्राधान्यीकृत भागधारकांनी सदरवेळी आणि सदर जागी हजर रहावे आणि मतदान करावे.

सदर योजनेच्या प्रती आणि कलम २३० खालील अकौंट स्टेटमेंट कंपनीच्या नोंदणीकृत ऑफीसमधून किंवा त्यांचे वकील श्री. वाय. सूर्यनारायण यांचे ऑफीसमधून म्हणजे फ्लॅट नं. १०६, पहिला मजला, निर्मल टॉवर्स, २००, साईबाबा मंदिराजवळ, द्वारकापुरी कॉलनी, पंजागुट्टा, हैद्राबाद-५०००८२ मोफत मिळतील. ज्या व्यक्ती बालाजी ग्रीनटेक प्रॉडक्टस् लिमिटेडच्या १० टक्के प्राधान्यीकृत भागधारकांच्या सभेला हजर राहण्यास व मतदान करण्यास पात्र असतील ते व्यक्तीशः किंवा प्रतिनिधीमार्फत मतदान करू शकतील, त्यासाठीचा जरूर तो फॉर्म कंपनीच्या नोंदणीकृत ऑफिसात म्हणजे बालाजी टॉवर्स, नं. ९/१अ/१, होटगी रस्ता, आसरा चौक, सोलापूर महाराष्ट्र-४१३२२४, भारत सभेच्या ४८ तास अगोदर जमा केलेला असल्यास.

प्रतिनिधीत्वासाठीचा फॉर्मदेखील कंपनीचे नोंदणीकृत ऑफीसमध्ये उपलब्ध असेल. मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई पीठाने श्री. गड्डम हेमंथ रेड्डी, संचालक आणि कंपनीचे अधिकारीक प्रतिनिधी यांची नेमणूक, त्यांचे गैरहजेरीत डी. राम रेड्डी, संचालक आणि कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी चेअरमन आणि श्री. लोकेश अग्रवाल, कंपनी सेक्रेटरी यांची सदर सभेचे निरीक्षक म्हणून नेमणूक केली आहे. जर वर नमूद केलेली एकत्रिकरणाची योजनेस सभेने मंजूर केल्यास तर ती मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाचे मंजुरीचा विषय होईल.

सही/-
**गड्डम हेमंथ रेड्डी,**
सभापती, १० टक्के प्राधन्यीकृत
भागधारकांचे न्यायाधिकरणाने
बोलावलेल्या सभेचे,
बालाजी ग्रीनटेक प्रॉडक्टस् लि.
DIN : 00003868

आज दि. २३ सप्टेंबर २०१७